**L. A. BILL No. LV OF 2026.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA
MONEY-LENDING (REGULATION) ACT, 2014.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५.**

**महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१४ चा महा. ८. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सावकारी (नियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३९ मध्ये,— २०१४ चा महा. ८.

(१) "पाच वर्षांपर्यंत" या मजकुराऐवजी, "सात वर्षांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) "पन्नास हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "एक लाख रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ४१ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४१ मध्ये, खंड (ग) मधील,—

(१) उप-खंड (एक) मधील,-

(क) "एक वर्षापर्यंत" या मजकुराऐवजी, "तीन वर्षांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) "पंधरा हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "पन्नास हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) उप-खंड (दोन) मधील,—

(क) "पाच वर्षांपेक्षा" या मजकुराऐवजी, "सात वर्षांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) "पन्नास हजार रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी, "एक लाख रुपयांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ४५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४५ मधील,—

(१) "दोन वर्षांपर्यंत" या मजकुराऐवजी, "तीन वर्षांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) "पाच हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "एक लाख रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५.]**

**[महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. बाबासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.**]**

**[ विधानसभेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.